# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१०/२०२२** **दिनांक २७.०९.२०२२**

**स्थळ- जिल्हा न्यायालय, अहमदनगर** **वेळ- दुपारी १२.३० वाजता**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व १००/२०२१ (सिव्हील ॲप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकरीता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीच्या दि.२२.०९.२०२२ रोजीच्या विशेष सभेमध्ये पुण्यतिथी उत्सवाकरीताचे तातडीच्या विषयावरील निर्णयासाठी त्याच अजेडयावर तदर्थ (Ad-hoc) समितीची विशेष सभा मंगळवार दि.२७.०९.२०२२ रोजी दुपारी १२.३० वा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे आयोजित करण्यात आली होती.

त्यानुसार तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दि.२७/०९/२०२२ रोजी दुपारी १२.३० वा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.**

- **मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा,**
  **प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
  **अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

- **मा.डॉ.राजेंद्र भोसले, भा.प्र.से.**
  **जिल्हाधिकारी अहमदनगर तथा**
  **सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

- **मा.श्रीमती भाग्यश्री बानायत, भा.प्र.से.**
  **मुख्य कार्यकारी अधिकारी, तथा**
  **सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

---

**विषय नं.०१** **दि.२६.०८.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.५१८** **आजची बैठक स्वल्पकालीन नोटीस देऊन स्वल्पावधीसाठी आयोजीत केल्यामुळे पुर्वी घेतलेल्या निर्णयांचे अध्ययन करणे आवश्यक असल्याने तदर्थ समितीची पुर्ण वेळ बैठक पुढे जेव्हा होईल त्या वेळेस हा विषय घेण्यात यावा.**

**(कार्यवाही- सभाकामकाज विभाग)**

---

**विषय नं.२** दि.२२.०९.२०२२ रोजी अहमदनगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

**निर्णय क्र.५१९** दि.२२.०९.२०२२ रोजी अहमदनगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

(कार्यवाही- सभाकामकाज विभाग)

---

**विषय नं.०३** श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०२२ मधील उत्सवातील वीणा, पोथी, फोटो, पाद्यपुजा, रुद्राभिषेक इत्यादी साठी मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सदस्यांची नावे निश्चीत करणेबाबत.

**निर्णय क्र.५२०** प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०२२ मधील उत्सवातील वीणा, पोथी, फोटो, पाद्यपुजा, रुद्राभिषेक इत्यादी साठी मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सदस्यांची नावे निश्चीत करण्यास मान्यता देण्यात आली. प्रस्ताव मंजुर.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

**विषय नं.०४** श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०२२ आयोजित करावयाच्या कीर्तन व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी कलाकार व मानधन निश्चित करणेबाबत.

**निर्णय क्र.५२१** सेवाभावाने विनामुल्य सेवा देणा-यांचा विचार करुन नविन कलाकारांना देखील संधी देण्याचा विचार करुन श्री. संजय रानडे यांनी दिलेला अभिप्राय विचारात घेऊन समितीने अनुक्रमांक १, २, ३ व ७ वरील नावे मंजुर करुन त्यांचा कार्यक्रम आयोजित करण्यास एकमताने मंजुरी दिली.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

**विषय नं.०५** संस्थानचे हैद्राबाद, बेंगलोर व चेन्नई येथील माहिती केंद्रातील कुशल कंत्राटी कर्मचारी यांचे वेतन व मुदतवाढीबाबत.

**निर्णय क्र.५२२** शासनाने आऊटसोर्स पध्दतीने सेवा घेण्यासाठी जे नियम बनविले आहेत तसेच केंद्र शासनाचे Manual for Public procurement of goods and services व Manual for procurement of consultancy and other services वैगरे याप्रमाणे नियमानुसार अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव समितीचे सभेपुढे सादर करावा. माहे नोव्हेंबर-२०२२ अखेर पर्यंत किंवा प्रस्तावावर निर्णय होईल यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत सदर कामी कर्मचा-यांना मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

**विषय नं.०६** संस्थानचे कायम व कंत्राटी कर्मचा-यांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करणेबाबत.

**निर्णय क्र.५२३** कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडून सर्वंकष प्रस्ताव बोलविण्यात यावा. नंतर तो प्रस्ताव विचारार्थ सभेपुढे मांडण्यात यावा.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

**विषय नं.०७** मौजे शिर्डी ता.राहाता येथील सि.स.नं ९३ क्षेत्र ९३.७ चौ.मी.या श्री व्दारकामाई मंदिराचे दक्षिण बाजूकडील मिळकत व त्यासमोरील मोकळी जागा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे नावे होणेबाबत.

**निर्णय क्र.५२४** श्री व्दारकामाई मंदिराचे दक्षिण व खुले नाटयगृहाचे उत्तरेकडील मिळकत व त्यासमोरील मोकळी जागा याचे भोगवटा सदरी कोणाचे नाव आहे व त्याचा भूमी अभिलेख काय आहे. याची माहिती घेऊन ती माहिती मा.जिल्हाधिकारी साहेब, अहमदनगर यांचेकडेस पाठविण्यात यावी, असे ठरले.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

**विषय नं.०८** श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारत बांधकाम प्रकल्पाचे लेबर कॅम्प येथे घडलेल्या घटनांबाबत व प्रकल्पाचे सद्यस्थितीबाबत तसेच ठेकेदार श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा.लि., मुंबई यांनी मुदतवाढ मिळणेसाठी केलेल्या विनंतीबाबत.

**निर्णय क्र.५२५** श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारत बांधकाम प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असल्याने उर्वरीत कामे पुर्ण करणेसाठी दंड आकारणी न करता ठेकेदार यांना दि.३१.१०.२०२२ अखेर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

**विषय नं.०९** आयकर कायदा- १९६१ च्या तरतुदीनुसार आर्थिक वर्ष २०२२-२३ अखेर रु.३०९ कोटी अखर्चित उत्पन्नाचा विनियोग करणेबाबत.

**निर्णय क्र.५२६** अवलोकन करुन नोंद घेतली. प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(कार्यवाही- लेखाशाखा विभाग)

---

**विषय नं.१०** आयकर विभागाच्या रु.४९८ कोटी कर भरणा नोटीसा तसेच आयकर विषयक कामकाजाची सद्यस्थिती.

**निर्णय क्र.५२७** उपरोक्त प्रकरणे अनेक वर्षापासुन प्रलंबीत आहेत. या प्रकरणात निकाल होईपावेतो येणा-या वर्षात देखील नविन प्रकरणे उद्भवणार आहेत. त्यामुळे मंत्रालयातील विधी व न्याय विभागामार्फत महाअधिवक्ता यांचा अभिप्राय घेऊन सदरहु प्रकरणे पुढे चालू ठेवायची किंवा कसे याबाबत निर्णय घेता येईल काय? याबाबत मार्गदर्शन मागविण्यात यावे. असे ठरले.

(कार्यवाही- लेखाशाखा विभाग)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेचा विषयावर चर्चा करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१** सन २०२२-२३ या वर्षाकरीता एल.आय.सी.ग्रुप ग्रॅज्युईटी इन्शुरन्स स्कीम नुतनीकरणाबाबत.

**निर्णय क्र.५२८** अंतिम तारीख आल्यामुळे सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आली. मात्र पुढील वर्षासाठी अशा प्रकारच्या वेगवेगळया शासकीय स्कीमचा अभ्यास करुन त्यापैकी संस्थानला फायदेशीर असणारी स्कीम कोणती याचा सविस्तर प्रस्ताव सभेपुढे सादर करावा. (कार्यवाही- लेखाशाखा)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२ संस्थानचे कनकुरी साठवण तलाव येथील विज पुरवठयाकरीता जोडून घेण्यात आलेल्या एल.टी. सप्लायाचे ग्राहक क्र.१६४७५८००३७०४ चे महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी यांनी कळविलेल्या दर संकेत बदलाच्या फरकाचे बीलाची रक्कम रु.१,२७,०२,४९०/- पैकी ५०% रक्कम रु.६३,५१,२४५/- मात्र माहितीस्तव सादर.

निर्णय क्र.५२९ संस्थानचे कनकुरी साठवण तलाव येथील विज पुरवठयाकरीता जोडून घेण्यात आलेल्या एल.टी. सप्लायाचे ग्राहक क्र.१६४७५८००३७०४ चे महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी यांनी कळविलेल्या दर संकेत बदलाच्या फरकाचे बीलाची रक्कम रु.१,२७,०२,४९०/- पैकी ५०% रक्कम रु.६३,५१,२४५/- मात्र आदा करणे बाबत C.G.R.F. Nashik यांचा आदेश असल्याने त्या आदेशाप्रमाणे रक्कम आदा करणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- विद्युत विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.३ संस्थानला देणगी स्वरुपात प्राप्त होणारे सोने चांदी वस्तुंची कस लावून तपासणी करुन मुल्यांकन करणेकामी नेमणेत आलेल्या मुल्यांकनकारांना (Gold-Silver) मुदतवाढ देणेबाबत.

निर्णय क्र.५३० संस्थानला देणगी स्वरुपात प्राप्त होणारे सोने चांदी वस्तुंची कस लावून तपासणी करुन मुल्यांकन करणेकामी नेमणेत आलेल्या मुल्यांकनकारांना (Gold-Silver) प्रस्तावात नमुद अटीशर्तीनुसार माहे डीसेंबर-२०२२ अखेर पर्यंत यांची सेवा सुरु ठेवण्यास मंजूरी देण्यात आली. परंतु सोबतच नव्याने निवड प्रक्रिया राबवावी किंवा कसे? याबाबत आणि पुर्नमुल्यांकनाकरीता वेगळी यंत्रणा राबविण्याची गरज आहे कींवा कसे याबाबत डीसेंबर-२०२२ या मुदतीच्या आत सविस्तर प्रस्ताव समिती सभेपुढे सादर करावा.

(कार्यवाही- लेखाशाखा विभाग)

---

वरील निर्णय क्र.५१८ ते ५३० सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायं. ४.१५ वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरीत/-
(भाग्यश्री बानायत, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

स्वाक्षरीत/-
(डॉ.राजेंद्र भोसले,भा.प्र.से)
जिल्हाधिकारी अहमदनगर तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

स्वाक्षरीत/-
(सुधाकर यार्लगड्डा)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा
अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.